नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 02/02/2021 (मंगळवार)
(दुपार)

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयातील बकरी चोरी करणारे 03 आरोपीतांना स्थानिक गुन्हे शाखा यांनी केले जेरबंद

पोस्टे मौदा येथील अप.क. 28/21 कलम 379 भादंवि अन्वये दाखल गुन्हा बकरी चोरीतील आरोपी शोधकामी दिनांक 01.02.2021 रोजी पोस्टे मौदा परिसरात फिरत असतांना गुप्त माहितीगाराकडुन माहिती मिळाली की, बकरी चोरीचे गुन्हयात जाखेगाव येथे राहणारा विनोद आकरे व त्याचे साथीदार सहभागी आहे व ते सद्या जितु मानवटकर यांचे पोल्ट्रीफार्म येथे बसलेले आहेत अशा खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखा येथील पथकाने तेथे जावुन विनोद आकरे, जितु मानवटकर, बोधिसत्व शेंडे यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता विनोंद उमरावजी आकरे वय 32, रा. जाखेगाव यांनी सांगितले की, त्यांने आपल्या गावातील 04 अल्पवयीन मुलांना हाताशी घेवुन स्वतःचे हुडंई युआन कार क्र. एमएच 29 ऐआर 0652 मध्ये सोबत जावुन कुही उमरेड, मौदा, अरोली या पोस्टे अंतर्गत असलेल्या वेगवेगळया गावामध्ये जावुन तेथील बकऱ्या चोरून त्या बकऱ्या आरोपी 1) जितेंद्र उर्फ जितु रामदास मानवटकर वय 40 वर्षे, रा. जाखेगाव, 2) बोधीसत्व सुखाराम शेंडे वय 41, रा. परसोडी यांचे मदतीने वेगवेगळया ठिकाणी विकल्याचे सांगितल्यावरून त्यांच्या ताब्यातुन बकरी विक्रीचे 80,000/- रू. रोख व गुन्हयात वापरलेली युआन कारसह एकुण 2,93,000/- रू. चा माल जप्त करून त्यांचेकडुन बकरी चोरीचे पो.स्टे.उमरेड येथील 5 गुन्हे, पोस्टे कूही येथिल 2, अरोली येथील 2 व मौदा येथिल 1 असे एकुण 10 गुन्हे उघड करण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक जावेद शेख, सहा. पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मीप्रसाद दुबे, पोलीस हवालदार विनोद काळे, गजेंद्र चौधरी, महेश जाधव, नाना राऊत, नायक पोलीस शिपाई अरविंद भगत, शैलेश यादव, रामा आडे, दिनेश आधापुरे, पोलीस शिपाई प्रणय बनाफर, सतिश राठोड, महिला पोलीस शिपाई नम्रता बघेल, स्नेहलता ढवळे, संगिता वाघमारे, चालक सहा. फौजदार साहेबराव बहाळे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर